## 'स्व - अभ्यास'.....

"श्री. सदानंद वाघमारेची इनरव्हील क्लब, मुलुंड (पूर्व) यांनी सरचिटणीस पदावरून हकालपट्टी केली आहे. संबंधितांना कळविण्यासाठी 'जाहीर निवेदन' तयार करा.

'कुर्ला' येथे नवे टर्मिनल सुरू झाले आहे. तिकीट विक्री, आरक्षण सुविधा आदी बाबींचा उल्लेख करून प्रवाशांसाठी जाहीर निवेदन तयार करा.

महाराष्ट्र शासन, कृषि बांधकाम विभाग, आरे. मुंबई- ६५ यांना ठेकेदाराकडून मुख्य रस्त्याच्या दुरूस्तीसाठी मोहोरबंद निविदा मागवावयाच्या आहेत. त्याकरिता जाहीर निवेदन आधारे "निविदा सूचना" तयार करा.

'गोकुळ' कोल्हापूर जिल्हा सरकारी दूध उत्पादक संघ लि. कोल्हापूर यांच्या दुधाची तंतोतंत छपाई असलेल्या नकली पिशव्यातून भेसळमय दूध "गोकुळ" दूध या नावाने विकले जात आहे. ग्राहकांना सावध करण्यासाठी कार्यकारी संचालक या नात्याने 'जाहीर निवेदन' तयार करा.

सतत ३०० दिवस गैरहजर राहणाऱ्या रामण्णा शेट्टी यांना नोकरीतून कमी केल्याची नोटीस तुम्ही 'जनरल मॅनेजर' आहात असे समजून जाहीर निवेदन (घोषणापत्र) तयार करा.